महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम
मंगळवार, दिनांक १ ऑगस्ट, २०१७
(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

दोन : लोकलेखा समितीचा बाविसावा अहवाल सभागृहास सादर करणे.

तीन : औचित्याचे मुद्दे.

चार : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(सोमवार, दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्र.१)

(१) **श्री. विजय काळे, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्य मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"पुणे महानगरपालिकेच्या ३८ बाह्य रुग्ण विभाग व १९ रूग्णालयामार्फत नागरिकांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात असणे, पुणे शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता नागरिकांसाठी अंशदायी वैद्यकीय साहाय्य योजनेअंतर्गत आरोग्य विभागाने औषध खरेदीच्या प्रक्रियेत ठराविक ठेकेदारांना लाभ होण्यासाठी त्यामध्ये अटी टाकून तीन पुरवठादारांना कोट्यवधी रुपयाचा फायदा मिळवून दिल्याचे माहितीच्या अधिकारात निदर्शनास येणे, औषध खरेदीच्या प्रक्रियेमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार ९०% जेनेरिक तर १०% ब्रँडेड औषधे असणे आवश्यक असतांना पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने वर्धमान,लक्ष्मी व प्रकाश मेडिकल यांच्या मार्फत खरेदीच्या रक्कमेवर किंवा औषधाच्या एम.आर.पी. च्या रकमेवर औषधे खरेदी करणे, बाजारात ५० ते ९०% स्वस्त दराने औषधे मिळत असतांना महानगरपालिकेने १९ ते २०% स्वस्त दराने औषधे खरेदी केल्याने महानगरपालिकेला दर वर्षी कोटयवधी रुपयांचे होत असलेले नुकसान, तसेच महापालिकेच्या सोनोग्राफी केंद्रासाठी खरेदी करण्यात आलेल्या मशीनची बाजारमूल्य किमत १३ लाख रुपये असतांना २३ लाख ८५ हजार रुपयांची खरेदी करणे तसेच इतर ३२ लाखांची मशीन सुमारे ५९ लाख रुपयांना खरेदी केल्याने त्यामध्ये झालेल्या गैरव्यवहाराची निवृत्त न्यायाधीश यांच्या मार्फत चौकशी करण्याची नागरिकांची होत असलेली मागणी, पुणे महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागामधील शेड्युल्ड मान्य १६६४ पदांपैकी ५१४ पदे रिक्त असून कमला नेहरू रुग्णालयात कोट्यवधी रुपयांची नूतनीकरणाची कामे करूनही अद्यापही ५ वर्षात आय.सी.यु. विभाग व कॅथन लॅब विभाग सुरु करण्यात न आल्याने नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, शहराच्या आरोग्याचा कारभार माहे नोव्हेंबर २०११ पासून प्रभारी आरोग्य प्रमुखांच्या मार्फत सुरु असल्याने

शहरातील नागरिकांना आवश्यक त्या वैद्यकिय सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी गत ७ वर्षापासून रिक्त असलेल्या आरोग्य प्रमुख पदावर उपसंचालक दर्जाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरिकांनी शासनाकडे केलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **श्री. शंभूराज देसाई, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"मौजे म्हारवंड व मौजे जिमनवाडी (ता.पाटण, जि.सातारा) ही गावे डोंगरी भागात वसलेली असणे, या दोन्ही गावांमध्ये प्रत्येकी ६८ कुटुंबे असणे, दोन्ही गावांच्या वर दरड असणे, माहे जुलै, २०१७ पासून सुरु असलेल्या अतिवृष्टीमुळे या दोन्ही गावांच्या वरील भागातील जमीनी मोठ्या प्रमाणात खचून मोठे दगडही निसटण्यास सुरुवात होणे, म्हारवंड व जिमनवाडी या गावांचीही परिस्थिती माळीण (जि.पुणे) या गावाप्रमाणेच असल्यामुळे या दोन्ही गावांतील ग्रामस्थांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, लोकप्रतिनिधी, तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय अधिका-यांकडून या दोन्ही गावांचे सर्वेक्षण करण्यात येवून या गावांच्या पुनर्वसनाचा अहवालही तयार करण्यात येणे, दरडी कोसळण्यास प्रतिबंध व्हावा यासाठी शासनामार्फत ठोस उपाययोजना राबविणे गरजेचे असणे, सदर दोन्ही गावांच्या पुनर्वसनाच्या कामांस शासनाकडून होत असलेल्या दिरंगाईमुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, ॲड. यशोमती ठाकूर, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. समीर कुणावार, राजु तोडसाम, ॲड. वारीस पठाण, सर्वश्री. योगेश सागर, अतुल भातखळकर, अबु आझमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"राज्यातील शासकीय व खासगी अनुदानित प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक भरतीला पूर्णपणे बंदी असताना शिक्षण अधिका-यांच्या संगनमताने तब्बल ७ हजार २२८ शिक्षकांची बेकायदा नेमणुक करण्यात येऊन शिक्षकांच्या वेतनावर ९७ कोटी रुपयांचा खर्च करण्यात आल्याचे माहे जून, २०१७ मध्ये निदर्शनास येणे, या प्रकरणी राज्यातील ६२ शिक्षण अधिका-यांना नोटिसा बजावूनही अद्यापपर्यंत त्यांच्यावर कोणतीच कारवाई न होणे, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता देत असताना आयुक्त, शिक्षण यांचे नाहरकत प्रमाणपत्र असणे आवश्यक असतांना उपसंचालक, शिक्षण यांनी आयुक्तांचे नाहरकत प्रमाणपत्र न घेताच मान्यता प्रदान केल्याचे निदर्शनास येणे, मान्यता आदेश देण्यास पळवाट म्हणून आयुक्तांच्या ना हरकतीस अधिन राहून असा उल्लेख करण्यात आलेला असणे, शिक्षक भरती संदर्भात १२६३ प्रकरणांत अनियमितता झाल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्याचा निर्णय घेण्यात येऊन तो नंतर थांबविण्यात येणे, उक्त प्रकरणाची चौकशी करून संबंधीत शिक्षणाधिकारी व विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्यावर गुन्हे दाखल करुन बेकायदेशीर

झालेली भरती प्रक्रिया तात्काळ रद्द करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. हनुमंत डोळस, अजित पवार, शशिकांत शिंदे, जयंत पाटील, दिलीप वळसे-पाटील, जितेंद्र आव्हाड, संदीप नाईक, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. दिपक चव्हाण, मकरंद पाटील, भास्कर जाधव, दिलीप सोपल, दत्तात्रय भरणे, सुरेश गोरे, किशोर पाटील, पंकज भुजबळ, सुनिल प्रभू, अबु आझमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सामाजिक न्याय मंत्र्याचे लक्ष वेधतील:-**

"राज्यातील ३६ जिल्ह्यांमधील जातपडताळणीच्या कामांसाठी केवळ चार अध्यक्ष कार्यरत असल्याने राज्यातील सुमारे तीन लाखांहून अधिक प्रकरणे प्रलंबीत असल्याचे नुकतेच निदर्शनास येणे, जातपडताळणी प्रमाणपत्राअभावी हजारो विद्यार्थ्यांना ऐन प्रवेश प्रक्रियेच्या वेळी मनस्ताप सहन करावा लागणे, सध्या दहावी, अकरावी, बारावीच्या विद्यार्थ्यांचे जातपडताळणीचे अर्ज विभागाकडे सतत येत असणे, याचबरोबर शासकीय नोकरीत रुजू होणाऱ्या उमेदवारांनासुध्दा जात वैधतेच्या प्रमाणपत्राची आवश्यकता असणे, परंतू प्रलंबित प्रकरणांची यादी मोठी असताना त्यात आणखी वाढ होत असणे, संपूर्ण राज्यातील ३६ समित्यांसाठी शासनाकडून केवळ सहा अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आलेली असल्यामुळे जातपडताळणीची हजारो प्रकरणे प्रलंबित असल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

पाच : सन २०१७-२०१८ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा).

(१) महसूल व वन विभाग.

(२) ग्रामविकास व जलसंधारण विभाग.

(३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग.

(४) सार्वजनिक आरोग्य विभाग.

(५) आदिवासी विकास विभाग.

(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)

[चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ०५.३० वाजता]

सहा : शासकीय विधेयके :

(अ) पुर:स्थापनार्थ :-

(१) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४४ — महाराष्ट्र मोटार वाहन कर (सुधारणा) विधेयक, २०१७.

(२) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र जमीन महसूल (जमिनीच्या वापराचे रुपांतर व अकृषिक आकारणी) नियम (सुधारणा) विधेयक, २०१७.

(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-

(१) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री शशिकांत शिंदे, अजित पवार, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, संजय कदम, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ, अबु आजमी, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, सुरेश लाड, राहुल मोटे, दिपक चव्हाण, संदीप नाईक, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, पांडुरंग बरोरा, हनुमंत डोळस, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, जयंत पाटील, राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ — श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४० — श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, सुनील केदार, अमर काळे, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४० — श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४० — श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(२) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री विजय वडेट्टीवार, अमिन पटेल, हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री शशिकांत शिंदे, अजित पवार, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, संजय कदम, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ, अबु आजमी, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, सुरेश लाड, राहुल मोटे, दिपक चव्हाण, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, पांडुरंग बरोरा, हनुमंत डोळस, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, जयंत पाटील, सुनील केदार, राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची

सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४१ — महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(३) (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये श्री. हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, सर्वश्री शशिकांत शिंदे, अजित पवार, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, संजय कदम, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ, अबु आजमी, डॉ.सतीश पाटील, सर्वश्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, सुरेश लाड, राहुल मोटे, दिपक चव्हाण, संदीप नाईक, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री जयदत्त क्षीरसागर, राजेश टोपे, पांडुरंग बरोरा, हनुमंत डोळस, वैभव पिचड, बाळासाहेब पाटील, जयंत पाटील, राणाजगजितसिंह पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ — महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) अध्यादेश, २०१७ नापसंत करते."

(ख) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४२ — महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४२ — महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४२ — महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४२ — महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेट पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४२ — महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.हर्षवर्धन सपकाळ, प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ४२ — महाराष्ट्र

दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

(४) (क) **सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३९ — महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१७.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, सुनील केदार, अमर काळे, विजय वडेट्टीवार, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३९ — महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राधाकृष्ण विखे-पाटील, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, जयदत्त क्षीरसागर, शशिकांत शिंदे, भास्कर जाधव, जितेंद्र आव्हाड, हसन मुश्रीफ, श्रीमती दिपीका चव्हाण, सर्वश्री सुरेश लाड, राणाजगजितसिंह पाटील, बाळासाहेब पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३९ — महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३९ — महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ङ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.वीरेंद्र जगताप, श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ३९ — महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (सुधारणा) विधेयक, २०१७ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(क) विधानसभेने संमत केलेले विधेयके महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १४१(१) अन्वये पुन्हा संमत करणे :-

(१) सन २०१७ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७.

(२) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७.

(३) सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक १० — भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७.

सात : सर्वश्री शंभुराज देसाई, बाबुराव पाचर्णे, राजाभाऊ वाजे, समीर कुणावार, सत्यजित पाटील, उन्मेश पाटील, किशोर पाटील, संतोष दानवे, डॉ.जयप्रकाश मुंदडा, श्रीमती संगिता ठोंबरे, डॉ.संजय रायमुलकर, सर्वश्री प्रशांत ठाकूर, अनिल बाबर, सुरेश हाळवणकर, प्रकाश आबिटकर, शिवाजीराव नाईक, सुभाष साबणे, शिवाजीराव कर्डिले, चंद्रदिप नरके, किसन कथोरे, ज्ञानराज चौगुले, डॉ.पंकज भोयर, श्री उल्हास पाटील, डॉ.सुनिल देशमुख, सर्वश्री अनिल कदम, हरिष पिंपळे, वैभव नाईक, राजू तोडसाम, राजन साळवी, डी. मल्लिकार्जुन रेड्डी, सदानंद चव्हाण, सुनिल प्रभू, सुधाकर भालेराव, राजेंद्र नजरधने, ॲड आकाश फुंडकर, सर्वश्री चरण वाघमारे, सुधीर पारवे, डॉ.तुषार राठोड, श्री अतुल सावे, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री अमल महाडीक, किर्तीकुमार भांगडीया, महेश लांडगे, रवी राणा, विनायकराव जाधव-पाटील, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-

"मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत वाड्या, वस्त्या व ग्रामीण भागातील ७२०० किमी रस्त्याच्या लांबीचे सन २०१५-१६ व २०१६-१७ करिता उद्दीष्ट ठरविलेले असणे, त्या व्यतिरिक्त राज्याच्या ग्रामीण भागात, डोंगरी विभागात तसेच छोट्या वस्त्या, वाड्या यांना जोडणारे गावपोहच रस्ते, मार्ग व छोटे पूल, मोरी, पांदण रस्ते यांच्या बांधकामाची व

दुरूस्तीची अपूर्ण कामे पूर्ण करण्याची आवश्यकता, राज्यातल्या ग्रामीण भागातील रस्त्यांच्या दर्जावाढीचे प्रस्ताव, माहे एप्रिल, २००९ पासून राबविण्यात येत असलेल्या केंद्र शासनाच्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेकरिता सन २०१५ पासून नवीन कामांना निधी उपलब्ध नसणे, सन २०१६-१७ पासून राबविण्यात येत असलेल्या राज्य शासनाच्या मुख्यमंत्री ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या निकषात न बसणाऱ्या व पिण्याच्या पाण्याची सोय नसणाऱ्या राज्यातील गावे, वाडे, वस्त्या यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करणे, ग्रामीण भागातील सर्व वाडया, वस्त्या व डोंगरी भागातील सर्व गावाचे विद्युतीकरण करण्याची आवश्यकता, शेती पाणी पुरवठा योजनेच्या वीज दरामध्ये झालेली दरवाढ, वीज बिलाची वसुली थांबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही."

आठ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-

(मंगळवार, दिनांक ७ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेली तथापि, पुढे ढकलण्यात आलेली अर्धा-तास चर्चेची सूचना) (क्रमांक १)

(१) **श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.**

"**शासनाने क्रीडा स्पर्धा सरावासाठी खेळाडूंना सवलत देण्याचा घेतलेला निर्णय**" या विषयावरील श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स यांचा दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक १७७ मधील प्रश्न क्रमांक ३४६८१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(मंगळवार, दिनांक २५ जुलै, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेल्या तथापि, पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक २ व ३)

(२) **श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स.**

"**चिखली (जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील असुविधांबाबत**" या विषयावरील श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स यांचा दिनांक ६ एप्रिल, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक २७० मधील प्रश्न क्रमांक ५५३४४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(३) **श्री. मनोहर भोईर, वि.स.स.**

"पनवेल (जि.रायगड) येथील रसायनी परिसरातील भाडेपट्टा कराराने घेतलेल्या जमिनीपैकी वापरात नसलेली शेतजमिन मूळ मालकास परत करण्याबाबत" या विषयावरील श्री. मनोहर भोईर व इतर वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७९३८५ ला दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(मंगळवार, दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजीच्या बॅलेटद्वारे ठरविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक ४ व ५)

(४) **श्री.प्रकाश फातर्पेकर, वि.स.स.**

"माझगांव (मुंबई) येथील शासनाच्या मालकीच्या भूखंडाची कच्छी लोहाना निवासी ट्रस्टने बेकायदा विक्री केल्याबाबत" या विषयावरील श्री.प्रकाश फातर्पेकर व इतर वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ७७१६० ला दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(५) **श्री.अजय चौधरी, वि.स.स.**

"मुंबईतील शिवडी येथील बारा बी.डी.डी. चाळींचा पुनर्विकास करण्याबाबत" या विषयावरील श्री.जयदत्त क्षीरसागर व इतर वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ८६६९९ ला दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ३१ जुलै, २०१७.

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.